॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 NATIONAL SERVICE SCHEME DEPARTMENT website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215246 E-mail: nss@srtmun.ac.in

जा.क्र.: रासेयो/२०२६—२७/०३ दिनांक : १०/०४/२०२६

**परिपत्रक**

प्रति,
मा.प्राचार्य/रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी,
रा.से.यो.राबविणारी सर्व संलग्नीत महाविद्यालये, व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर,
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय: ११ एप्रिल २०२६ रोजी थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती साजरी करणे बाबत.**

संदर्भ: मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, रा.से.यो., महाराष्ट्र शासन. मुंबई यांचे जा.क्र. रासेयो—२०२६/प्र.क्र.२७/रासेयो कक्ष.दि. १० एप्रिल २०२६.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भिय पत्रान्वये मा. डॉ. मिलिंद काळे, राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन. मुंबई यांनी थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती ११ एप्रिल २०२६ रोजी रा.से.यो. संलग्नित विद्यापीठे/अंतर्गत महाविद्यालयात साजरी करण्यात यावी. त्यांच्या २०० व्या जयंती वर्षाकडे वाटचाल करीत असताना त्यांनी समाजासाठी केलेल्या कार्याला विनम्र अभिवादन म्हणून खालील विविध उपक्रमांचे आयोजन करण्यास कळविलेले आहे.

- मुलींच्या शिक्षणासाठी जनजागृती रॅली/बेटी बचाव बेटी पढाव या अभियानाचा प्रचार करणे.
- सार्वजनिक ठिकाणी श्रमदान (स्वच्छता मोहिम) राबविण्यात याव्यात.
- "अधुनिक भारतातील समाज सुधारक/स्त्री शिक्षण" या विषयान्वये वक्तृत्व स्पर्धा/निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे.

तरी त्यानुषंगाने रा.से.यो. संलग्नीत सर्व महाविद्यालये व रा.से.यो. पथक विद्यापीठ परिसर, यांना सुचित करण्यात येते की, उपरोक्तपणे निर्देशित केल्यानुसार आपल्या महाविद्यालयात दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी थोर समाज सुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांची जयंती उपरोक्त उपक्रमांनी साजरी करण्यात यावी व त्याबाबतचा अहवाल राज्य संपर्क अधिकारी व विशेष कार्य अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन. मुंबई यांना सादर करावयाचा असल्यामुळे न चूकता सदरील अहवाल रा.से.यो. विभागाच्या **nss@srtmun.ac.in** या ई—मेल वर पाठविण्यात यावा, ही विनंती.

**डॉ. मारोती गायकवाड**
**संचालक**
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

**प्रत माहितीस्तव:**

१) मां. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३) मा.जनसंपर्क अधिकारी, जनसंपर्क कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.

**प्रत माहिती तथा कार्यवाहिस्तव:**

१) सिस्टीम एक्सपर्ट, संगणक कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या व रा.से.यो विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे, ही विनंती.

Scanned with OKEN Scanner